सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी पंचायत समिती देसाईगंज जि. गडचिरोली निवासी इमारतीच्या बांधकामासाठी सहाय्यक अनुदान वितरण आदेश.

लेखाशिर्ष-२५१५ १२५६ (योजनांतर्गत)

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः योजना-२०१७/प्र.क्र.२०२/बांधकाम-४
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दिनांक: २४ जानेवारी, २०१८

वाचा :-

१) शासन परिपत्रक वि.वि. क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.७५/अर्थसंकल्प-३,दि.१८.०४.२०१७
२) शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.९४/ अर्थसंकल्प-३,दि.३०.०६.२०१७
३) शासन निर्णय ग्रा.वि.वि. क्र. योजना २०१७/ प्र.क्र. २२/बांधकाम-४ दि.१०.१०.२०१७

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता संपूर्ण अर्थसंकल्पास मंजूरी मिळाली असून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवासी इमारतींच्या बांधकामासाठी एकूण रू.१५००.००लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित झालेली असून, मंजूर तरतूदीच्या ७० टक्के मर्यादेत लेखाशर्ष-२०१५ १२५६ (योजनांतर्गत) या लेखाशिर्षांतर्गत खर्च भागविण्याकरीता वित्त विभागाने रू.१०५०.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिली आहे.

२. वित्त विभागाच्या संदर्भिय दिनांक १८.०४.२०१७ व दिनांक ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार प्रशासकीय विभागांना दिलेल्या निधी वितरणाच्या अधिकाराच्या विहित मर्यादेच्या अधीन राहून, पंचायत समितीच्या निवासी इमारतींच्या बांधकामासाठी एकूण एकूण रक्कम रू. २९०.३१ लक्ष इतके सहायक अनुदान माहे ऑक्टोबर, २०१७ च्या कॅश-फ्लो मध्ये मंजूर करुन, संबंधित जिल्हा परिषदांना वितरीत करण्यात आले आहे.

३. वित्त विभागाच्या संदर्भिय दिनांक १८.०४.२०१७ व दिनांक ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार प्रशासकीय विभागांना दिलेल्या निधी वितरणाच्या अधिकाराच्या विहित मर्यादेच्या अधीन राहून, पंचायत समिती देसाईगंज जि. गडचिरोली निवासी इमारतींच्या बांधकामासाठी यापूर्वी देण्यात आलेल्या रु. १८०.२६ लक्ष इतका अखर्चित राहिलेला निधी शासनास समर्पित केल्यामुळे याबाबतची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी रु. ४१.०० लक्ष (एकेचाळीस लक्ष फक्त) इतके सहायक अनुदान माहे

जानेवारी, २०१८ च्या कॅश-फ्लो मध्ये मंजूर करुन, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्या अधिनस्त ठेवण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

४. या कामाकरीता होणारा खर्च मागणी क्र. एल-३ "२५१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, १०१-पंचायत राज, ३१-सहायक अनुदाने (०१) (०५) जिल्हा परिषदांच्या निवासी इमारत बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (२५१५ १२५६) (योजनांतर्गत)" या लेखाशिर्षा खाली सन २०१७-१८ साठी करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. वरीलप्रमाणे ज्या कामाच्या प्रयोजनार्थ निधी उपलब्ध करुन दिलेला आहे, तो त्याच कामावर तात्काळ खर्च करुन, सदर सहाय्यक अनुदानाच्या विनियोजना संबंधीचे उपयोगिता प्रमाणपत्रे, महालेखापाल, संबंधीत विभागीय आयुक्त यांना पाठवून, त्याची प्रत या विभागाकडे आठ दिवसांत पाठविण्याची जबाबदारी संबधित मुख्य वित्त व लेखा अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील. तसेच सदर अनुदानाच्या विनियोजना संबधी महालेखापाल कार्यालयास पाठविण्यात आलेल्या उपयोगिता प्रमाणपत्राची प्रत शासनास मुदतीत पाठविण्यात न आल्यास व सदरहु बांधकामाबाबतची माहिती इमारत बांधकामाकरीता विकसीत करण्यात आलेल्या कंस्ट्रक्शन ट्रॅकर या प्रणालीवर न भरल्यास संबंधित जिल्हा परिषदेच्या कामावर पुढील सहायक अनुदान वितरीत केले जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

६. प्रस्तुतचा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं -२०१७/प्र.क्र.७५/ अर्थसंकल्प -३,दि.१८.०४.२०१७ व शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/ अर्थसंकल्प -३, दि. ३०.०६.२०१७ मधील अटी-शर्तीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१८०१२४१८०१३७०२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dilip Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e461e0a32ec649f0a60e4372f7cbbb3edff433d33cc0d95db6f8dbf1fa4f7f, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2018.01.25 11:38:39 +05'30'

(दि.बा.पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद
२.विभागीय आयुक्त, नागपूर विभाग नागपूर

३.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा, महाराष्ट्र - १ मुंबई / महाराष्ट्र - २, नागपूर.
४.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली
५.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली
६.कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, गडचिरोली
७.जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली
८.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा गडचिरोली
९.उपमुख्य लेखा परिक्षक, जिल्हा गडचिरोली
१०.गट विकास अधिकारी, पं. स. गडचिरोली
११.वित्त विभाग (व्यय- १५ , अर्थ-१६) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१२.नियोजन विभाग (कार्या-क्र.१४४४) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१३.कार्यासन अधिकारी- वित्त-१, वित्त-७ ग्राम विकास व जलसंधारण विभाग,बांधकाम भवन मर्झबान पथ फोर्ट मुंबई-४०० ००१
१४.निवडनस्ती- बांधकाम-४ ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन मर्झबान पथ फोर्ट मुंबई-४०० ००१